महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासनअंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्सक्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रवका//न.क्र.०५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉटनं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक :०५.०९.२०२२

# प्रशासकीय परिपत्रक क्र. ६४४ दि. ०५/०९/२०२२

विषय : कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक यांची उपस्थितीबाबत आणि अनुषंगीक नियमांमध्ये बदल करण्याबाबत.

संदर्भ: १. मराविविकं वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५ चे सुधारपत्र क्र.२७ दि.१२.०८.२०१०.
२. मराविविकं वर्गीकरण व सेवाप्रवेश विनियम-२००५ चे सुधारपत्र क्र.८४ दि.०५.०३.२०२०.
३. पत्र क्र.मासंवि/रवका/न.क्र.३९४/२००२२ दि.२५.११.२०२०.

मनुष्यबळ पुनर्विलोकन कक्ष, कार्यालयीन आदेश क्र. १२ दि. १२.०८.२०१० अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील शाखा कार्यालयातील तंत्रज्ञ (तांत्रिक सहाय्यक) हे पद रद्द करुन "कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक" हे पद मंजुर केलेले आहे. सदरचे पद म.रा.वि.वि.कं.मर्यादित सेवाप्रवेश विनिमय २००५ याला सुधार पत्र क्र. २७ दि. १२.०८.२०१० नुसार शाखा कार्यालयाच्या आस्थापनेवर वर्ग ४ (अतांत्रिक) मध्ये समाविष्ट केलेले आहे.

२. "कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक" यांना साप्ताहिक सुट्टी व्यतिरिक्त शनिवार आणि सार्वजनिक सुट्टया मंजुर करण्याचे स्पष्टीकरण संदर्भिय पत्र क्र.०३ अन्वये यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेले आहे. आता, कंपनीच्या शाखा कार्यालयांतील कर्मचाऱ्यांना उपस्थितीबाबत प्रशासकीय कार्यालयांचे नियम लागू नसल्याने तसेच "कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक" हे पद अतांत्रिक असल्याने यापूर्वी "कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक" यांना दुसरा आणि चौथा शनिवारची सुट्टी देण्यात येत होती. तदनंतर प्रशासकीय कार्यालयांना पाच दिवसांचा आठवडा लागू झाल्यापासून शनिवारची सुट्टी तसेच इतर सार्वजनिक सुट्टया लागू होत्या. "कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक" यांची शनिवारी व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी शाखा कार्यालयात अनुपस्थिती असल्याने दैनंदिन कामकाजात त्यांची उणीव भासते व शनिवारी कार्यालयास भेट देणाऱ्या ग्राहकांची संख्या जास्त असल्याने ग्राहक सेवांवर त्याचा विपरित परिणाम होत आहे. यात सुधारणा करण्याच्या अनुषंगाने "कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक" यांना शनिवार तसेच इतर सार्वजनिक सुट्टया न देता, शाखाधिकारी / तांत्रिक कर्मचाऱ्यांप्रमाणेच उपस्थितीचे नियम लागू करण्याचा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता.

३. सबब, सदर प्रकरणी मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक हे संचालक (संचलन), संचालक (वित्त), संचालक (वाणिज्य), संचालक (प्रकल्प) आणि संचालक (मासं) यांच्याशी विचार विनिमय करुन कंपनीच्या क्षेत्रिय कार्यालयातील तांत्रिक कर्मचाऱ्यांना म्हणजेच ज्यांना प्रचलित नियमांनुसार दुसरा आणि चौथा शनिवार (सद्यस्थितीत सर्व शनिवार) ची सुट्टी लागू नाही, अशा कर्मचाऱ्यांप्रमाणेच "कनिष्ठ कार्यालयीन सहाय्यक" यांना ते जोपर्यंत महानगरपालिका क्षेत्रातील शाखा कार्यालयात कार्यरत आहेत तोपर्यंत त्यांना शाखा कार्यालयातील तांत्रिक कर्मचाऱ्यांप्रमाणे उपस्थितीचे नियम लागू करण्यास व खालीलप्रमाणे लाभ देण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे.

एक) सा.आ.क्र. १४२ दि. १४.०६.१९९६ नुसार प्रतिवर्ष १० दिवस विशेष पूरक रजा (Special Compenstory Leave) अनुज्ञेय राहील.

दोन) सा.आ.क्र. १४२ दि. १४.०६.१९९६ अन्वये देण्यात येणारा विशेष पूरक भत्ता (Special Compenstory Allowance) अनुज्ञेय राहील.

तीन) मराविविकंम, कर्मचारी सेवाविनियम-२००५ मधील सेवाविनियम क्र.४३ नुसार परिशिष्ट-"क" मधील कर्मचाऱ्यांना देय असणारे रजेबाबतचे नियम लागू करण्यात यावेत म्हणजेच प्रशासकीय कार्यालयास लागू असलेल्या सार्वजनिक सुट्ट्या न देता ६ दिवस भरपगारी रजा देण्यात यावी.

चार) सन २०२२ करिता विशेष पुरक रजा हया उर्वरित महिन्याकरिता प्रमाणित (Proportionate) देण्यात याव्यात. तसेच, सन २०२२ च्या उर्वरित कालावधीत एकुण २ सार्वजनिक सुट्ट्या देण्यात याव्यात.

४. उपरोक्त बदल हे प्रशासकीय परिपत्रक निर्गमित झाल्यापासून लागू राहतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

(अ.म. भावीकर)
कार्यकारी संचालक (मासं)

**प्रत सविनय सादर:**

१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

२) कार्यकारी संचालक (सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**प्रत रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

५) महाव्यवस्थापक (मासं)/(नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

६) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

७) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.